# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 30.03.2026** **वार- सोमवार**

---

**पाऊस**

पुणे शहरातील बहुतांश भागांत तसंच उपनगरांमध्ये आज दुपारनंतर पावसानं जोरदार हजेरी लावल्यानं जनजीवन विस्कळीत झालं. औंध, बाणेर आणि मध्यवर्ती भागात गारांचा पाऊस पडला. गावातील पेठांचा परिसर तसंच मुंढवा, केशवनगर, हडपसर लोहगाव, बालेवाडी, फुरसुंगी, सिंहगड रस्ता, मांजरी, वाघोली या भागांमध्येही मुसळधार पावसाची नोंद झाली, त्यामुळे सगळीकडेच नागरिकांना वाहतूक कोंडीला सामोरे जावं लागलं. पिंपरी चिंचवड मध्येही अनेक ठिकाणी पावसाची नोंद झाली.

आज कमाल तापमान 34 तर किमान तापमान 21  पूर्णांक 7 दशांश अंश सेल्सियस नोंदवलं गेलं. हवामान विभागानं उद्याही मेघगर्जनेसह पावसाची शक्यता वर्तवली आहे.

**पीएनजी**

पाइपद्वारे नैसर्गिक वायू म्हणजे पीएनजी सुविधा उपलब्ध असलेल्या शहरांमध्ये नागरिकांनी तीन महिन्यांच्या आत पीएनजी जोडणीसाठी अर्ज करणे बंधनकारक असल्याची माहिती अन्न आणि नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी आज मुंबईत पत्रकार परिषदेत दिली. देशांतर्गत इंधन व्यवस्था अधिक मजबूत करण्यासाठी पीएनजीला प्रोत्साहन दिलं जात असल्याचं त्यांनी स्पष्ट केलं.
नागरिकांमधील संभ्रम आणि भीती दूर करण्यासाठी स्वस्त धान्य दुकानांमधून तीन महिन्यांचं अन्नधान्य आगाऊ देण्यास परवानगी देण्यात आली आहे. तसंच केरोसिनचं  वाटपही सुरू करण्यात आलं असल्याची माहिती त्यांनी दिली.

**वैद्यकीयमदत**

पुणे रिंग रोडनं प्रवास करणाऱ्यांना गरज भासल्यास तातडीची वैद्यकीय मदत उपलब्ध करून देण्यासाठी पूर्व आणि पश्चिम मार्गावर प्रत्येकी तीन हेलिपॅड उभारण्यात येणार आहेत, तर पुणे-मुंबई द्रुतगती मार्गावर आणखी दोन हेलिपॅड तयार करण्यात येत आहेत. पुणे रिंग रोडच्या पश्चिम भागातील मार्गाचं काम डिसेंबर 2027 अखेर पूर्ण करण्याचं नियोजन असून, त्यानंतर लगेचच तो वाहनांसाठी खुला करण्यात येणार आहे, अशी माहिती महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाचे अधीक्षक अभियंता राहुल वसईकर यांनी दिली.

**पाणीपुरवठा**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीत ज्या विकसकांनी फ्लॅटधारकांना ताबा देण्यापूर्वी पाणीपुरवठ्याची जबाबदारी स्वीकारत लेखी हमीपत्र दिले आहे, त्यांनी ती जबाबदारी काटेकोरपणे पार पाडणे बंधनकारक आहे असा इशारा पिंपरी चिंचवड महानगरपालिका आयुक्त डॉक्टर विजय सूर्यवंशी यांनी दिला आहे.  पाणीपुरवठ्याचा आर्थिक भार गृह-संकुलांवर टाकल्यास महानगरपालिका संबंधितांविरुद्ध कठोर कायदेशीर कारवाई करेल  असंही त्यांनी नमूद केलं. पाणीपुरवठ्याबाबत स्थापन करण्यात आलेल्या समितीची बैठक नुकतीच पार पडली त्यावेळी ते बोलत होते. भामा-आसखेड, आंद्रा पाणीपुरवठा योजनेसह काही महत्त्वाच्या जलपुरवठा प्रकल्पांची कामं, अद्याप अपूर्ण असल्यामुळे सर्व क्षेत्रांना १०० टक्के पाणीपुरवठा करणे सध्या शक्य नसल्याचं यावेळी सांगण्यात आलं.

**करवसूली**

आर्थिक वर्ष संपण्यासाठी शेवटचे दोन दिवस शिल्लक राहिले असून थकबाकीदारांनी लवकरात लवकर मालमत्ता कर भरुन महापालिकेच्या अभय योजनेचा लाभ घ्यावा, असं आवाहन पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीनं करण्यात आलं आहे.

**पुरस्कार**

विश्वबंधुता साहित्य परिषदेच्या वतीनं दिला जाणारा 'विश्वबंधुता दर्पण पुरस्कार' यंदा ज्येष्ठ साहित्यिक ॲडवोकेट प्रार्थना सदावर्ते आणि नेत्ररोगतज्ञ डॉक्टर आदित्य केळकर यांना जाहीर करण्यात आला आहे. संस्थेसाठी दिल्या जाणाऱ्या पुरस्कारासाठी रयत शिक्षण संस्थेच्या पिंपरी इथल्या महात्मा फुले महाविद्यालयाची निवड करण्यात आली आहे.

**पालखी मुक्काम**

आळंदी देवस्थाननं यंदा पुण्यातील भवानी पेठेमधल्या पालखी विठोबा मंदिरातल्या  माऊलींच्या पालखी सोहळ्याचा मुक्काम, अन्यत्र हलविण्याचा पवित्रा घेतला आहे. पुण्यातील दोन दिवसांच्या मुक्कामाच्या जागेला अन्यत्र पर्याय निवडण्यासंदर्भातील अंतिम निर्णय १३ एप्रिलला जाहीर करण्यात येईल, अशी माहिती आळंदी देवस्थानचे पालखी सोहळा प्रमुख राजेंद्र उमाप यांनी दिली. आळंदीहून पंढरपूरला जाताना पुण्यातील पालखी विठोबा मंदिरात मुक्काम न करण्याचा निर्णय घेण्यात आला तरी परतीच्या प्रवासात पुण्यात या ठिकाणी मुक्काम करण्याबाबत पर्याय उपलब्ध आहे.

**खाद्यसंस्कृती**

खाणे ही केवळ माणसाची मूलभूत गरज नसून ती त्याच्या संस्कृतीची, इतिहासाची आणि प्रगल्भ विचारांची खरी ओळख आहे. तुम्ही जेवढ्या विविध चवींना सामोरे जाता आणि दुसऱ्याची खाद्यसंस्कृती स्वीकारता, तेवढे तुम्ही अधिक उदारमतवादी, विशालहृदयी आणि क्षमाशील बनता असं मत ज्येष्ठ पत्रकार आणि खाद्यसंस्कृतीचे अभ्यासक डॉक्टर इब्राहीम अफगाण यांनी व्यक्त केलं. फर्ग्युसन कॉलेज रस्त्यावरील 'विद्यार्थी सहाय्यक समिती'च्या सभागृहात नुकताच  'भवताल टॉक-९' हा कार्यक्रम झाला, यावेळी 'खाण्यावर बोलू काही..' या विषयावर डॉक्टर अफगाण यांनी उपस्थितांशी गप्पा मारल्या.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**